यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai



# १८वा वार्षिक अहवाल २००२-०३
# 18th ANNUAL REPORT 2002-03

## राष्ट्रीय पुरस्कार व राज्यस्तरीय पारितोषिक वितरण




यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार मा.श्री. शरद पवार, अध्यक्ष यांच्या हस्ते स्वीकारतांना मा.डॉ. जयंत नारळीकर, सोबत मा.श्री. मोहन धारिया, कार्याध्यक्ष, मा.न्या.वाय.व्ही. चंद्रचूड, मा.श्री. हुसेन दलवाई, मा.श्री. किरण शांताराम व मा.सौ. नारळीकर.




यशवंतराव चव्हाण कृषि-औद्योगिक समाजरचना पारितोषिक मा.श्री. शरद पवार, अध्यक्ष यांच्या हस्ते स्वीकारताना 'प्रयोग परिवार' संस्थेचे श्री. देवदत्त दाभोलकर, सोबत मा.श्री. मोहन धारिया, कार्याध्यक्ष, मा.श्री. गोविंदराव तळवलकर, मा.न्या.वाय.व्ही. चंद्रचूड व श्रीमती वृंदा श्रीपाद दाभोलकर.

# १८ वा

# वार्षिक अहवाल

# २००२-२००३

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई-४०० ०२१.

दूरध्वनी क्र. २२०२८५९८, २२८५२०८१, २२०४५४६०, २२८५२३४५

फॅक्स : २२८५२०८२

Email : ybchavan@bom3.vsnl.net.in

Visit us : ybchavanpratishthan.org

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई

## वार्षिक अहवाल
## २००२-२००३

## अनुक्रमणिका


| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | यशवंतराव चव्हाण केंद्रातील उपक्रम | ४ |
| २. | यशवंतराव चव्हाण केंद्रात झालेले महत्त्वाचे कार्यक्रम | ७ |
| ३. | प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या स्पर्धा-पारितोषिक योजना | ८ |
| ४. | विशेष कार्यक्रम | १० |
| ५. | माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | १२ |
| ६. | प्रतिष्ठानच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर कार्यक्रम/उपक्रम | १३ |
| ७. | यशवंतराव चव्हाण शिष्यवृत्ती | १४ |
| ८. | प्रतिष्ठानमार्फत देण्यात आलेली अनुदाने | १४ |
| ९. | प्रतिष्ठानला मिळालेले अनुदान | १५ |
| १०. | प्रतिष्ठानच्या विभागांमार्फत झालेले कार्यक्रम/उपक्रम | १५ |
| ११. | प्रतिष्ठानची विभागीय केंद्र | २३ |
| १२. | कर्तापत्र | २८ |
| १३. | वैधानिक लेखापरीक्षकांचा दाखला | २९ |
| १४. | हिशोबी पत्रके व परिशिष्टे | ३० |
| १५. | प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने | कव्हर मलपृष्ठ |

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई

ट्रस्ट रजि. नं. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. नं. एम.एम.एच/बी ओ.एम-५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई-४०० ०२१.

## विश्वस्त मंडळ सदस्य

| | |
|---|---|
| १. मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| | उपाध्यक्ष |
| २. मा. श्री. मोहन धारिया | कार्याध्यक्ष |
| ३. मा. श्री. श.गं. काळे | सरचिटणीस |
| ४. मा. श्री. कमलाकर म्हेत्रे | कोषाध्यक्ष |
| ५. मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर | |
| ६. मा. डॉ. निळकंठराव कल्याणी | |
| ७. मा. प्रा. पी.बी. पाटील | |
| ८. मा. श्री. राम प्रधान | |
| ९. मा. श्री. गुलाम गौस | |
| १०. मा. श्री. लक्ष्मण माने | |
| ११. मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| १२. मा. श्री. ज्ञानेश्वर खैरे | |
| १३. मा. श्री. हुसेन दलवाई | |
| १४. मा. डॉ. रवि बापट | |
| १५. महाराष्ट्र शासन प्रतिनिधी | |
| १६. महाराष्ट्र शासन प्रतिनिधी | |

## कार्यकारिणी मंडळ सदस्य

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. मोहन धारिया
३. मा. श्री. श.गं. काळे
४. मा. श्री. कमलाकर म्हेत्रे
५. मा. डॉ. राम ताकवले
६. मा. श्री. ज्ञानेश्वर खैरे
७. मा. श्री. ना. धों. महानोर
८. मा. श्री. हुसेन दलवाई
९. मा. डॉ. व्ही. सुब्रमण्यन्
१०. मा. श्री. जी.टी. महाजन
११. मा. श्री. एन.के.पी. साळवे
१२. मा. श्री. के.बी. आवाडे
१३. मा. डॉ. रवि बापट
१४. मा. श्री. गिरीश गांधी
१५. मा. श्री. प्रेमानंद रुपवते
१६. मा. श्री. शिवाजीराव गि. पाटील
१७. मा. श्री. विनय कोरे
वारणा सहकारी साखर कारखाना, वारणानगर
१८. मा. श्री. अंकुशराव टोपे
१९. मा. श्री. शामराव पा. पाटील
मा. अध्यक्ष, सह्याद्रि सहकारी
साखर कारखाना, कराड- (पदसिद्ध)
२०. मा. श्री. गुलाबराव शेळके
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.-(पदसिद्ध)
२१. महाराष्ट्र शासन प्रतिनिधी

## कार्यकारी समिती

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. मोहन धारिया
३. मा. श्री. श.गं. काळे
४. मा. श्री. कमलाकर म्हेत्रे
५. मा. श्री. ज्ञानेश्वर खैरे
६. मा. श्री. हुसेन दलवाई
७. मा. डॉ. रवि बापट

मा. श्री. त्र्यं.भा. खेडकर-संचालक (प्रशासन)

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान. मुंबईचा सन २००२-२००३ चा वार्षिक अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

**व्यवस्थापन :**

मा.यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा व कार्याचा प्रसार करण्यासाठी प्रतिष्ठानतर्फे विविध प्रकारचे उपक्रम प्रतिवर्षी राबविण्यात येतात. उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी नेमलेल्या कार्यकारी समितीच्या ८ बैठका घेण्यात आल्या व विविध विषयांवर सांगोपांग चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. सदर समितीचे सदस्य. पदाधिकारी, विविध विभागांचे प्रमुख नियमितपणे आपापले कामकाज करीत आहेत. अहवाल वर्षात विश्वस्त मंडळाच्या ३ व कार्यकारिणी मंडळाच्या ३ सभा झाल्या. प्रतिष्ठानच्या हिशेबाची तपासणी प्रत्येक महिन्याला अंतर्गत हिशेब तपासनीस मेसर्स पोक्षे-कुलकर्णी आणि कंपनी, चार्टर्ड अकाउंटंट यांचेमार्फत केली जाते व त्याचा अहवाल कार्यकारी समितीपुढे ठेवला जातो. वार्षिक हिशेबाची तपासणी सांविधिक हिशेब तपासनीस मेसर्स ए.एस.मेहेंदळे आणि कंपनी यांच्याकडून झाली असून त्याचा अहवालही विश्वस्त मंडळ व कार्यकारिणी मंडळासमोर ठेवण्यात आला. वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास आधीन राहून प्रत्येक विभागीय केंद्रासाठी व मुख्य कार्यालयातील विविध विभागांना तरतुदी दिलेल्या असून त्यांच्याकडून तिमाही अहवाल मागविले जातात. प्रतिष्ठानची वेबसाईट **ybchavanpratishthan.org** असून ती वेळोवेळी अद्ययावत् करण्यात येते.

सभासद संख्या : अहवाल वर्ष अखेर (३१ मार्च २००३) प्रतिष्ठानच्या सभासदांची संख्या खालीलप्रमाणे-

१. **संस्थापक सदस्य** ८२
२. **आजीव सदस्य** १४०
३. **संस्था सदस्य** २८

महाराष्ट्र शासनाने आपले दोन प्रतिनिधी विश्वस्त मंडळावर नेमलेले आहेत. त्यापैकी एक प्रतिनिधी कार्यकारिणी मंडळावरही नेमण्यात आला आहे.

**१.यशवंतराव चव्हाण केंद्रातील उपक्रम :**

**अ) मुख्य सभागृह :** यशवंतराव चव्हाण केंद्रातील सभागृहाचा वापर, प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांसाठी तसेच निरनिराळ्या सामाजिक संस्था, शासनातर्फे आयोजित केलेल्या सभा, संमेलने, चर्चा, परिसंवाद, चित्रपट, सांस्कृतिक कार्यक्रम यासाठी करण्यात आला. मराठी, हिंदी, गुजराती व इंग्रजी नाटके,

संगीतसभा आदि दर्जेदार कार्यक्रम वर्षभर झाले. सभागृह सर्व सोयींनीयुक्त तसेच अद्ययावत् करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सभागृहात डॉल्बी म्युझिक सिस्टिम बसविण्यांत आली आहे. केंद्र इमारतीमध्ये सध्या कार्यरत असलेली वातानुकूलन यंत्रणा (पाण्याच्या प्रक्रियेवर चालणारी) बदलुन अत्याधुनिक व तुलनने कमी खर्चाची वातानुकूलन यंत्रणा (हवेच्या प्रक्रियेवर चालणारी) बसविण्याचा निर्णय वास्तुविशारद-मेसर्स शशी प्रभु ॲण्ड असोशिएटस्,मुंबई यांच्या सल्ल्याप्रमाणे घेण्यात आलेला आहे. त्याचे काम चालू आहे.

**ब) सांस्कृतिक सभागृह** : या सभागृहांत आता कलाप्रदर्शनाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. या कलादालनामध्ये अनेक मान्यवर कलाकारांची रंगचित्रे, छायाचित्रे, रेखाटनचित्रे व हस्तकलेच्या वस्तू यांची प्रदर्शने भरविण्यात येतात. नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी कलादालनातर्फे 'मान्सून शो' तसेच ज्येष्ठ कलाकारांच्या कलाकृतींची प्रदर्शने आयोजित करण्यात आली. देशाच्या व राज्याच्या विकासाशी संबंधित सामाजिक, राजकीय व आर्थिक स्वरुपाच्या परिषदा, परिसंवाद व चर्चासत्रे घेण्यासाठी तसेच नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी मुख्य सभागृह, सांस्कृतिक सभागृह तसेच कलादालन कार्यकारी समितीच्या संमतीने सवलतीच्या दरात देण्यात येतात.

**क) यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय** : यशवंतराव चव्हाण ग्रंथालयाच्या उद्दिष्टाप्रमाणे ग्रंथालयात अनेक विषयांवरील ग्रंथ विकत घेतलेले आहेत. त्यात राज्यशास्त्र, समाजशास्त्र, शेती, सहकार, पर्यावरण, महाराष्ट्राची संस्कृती व इतिहास, ग्रामीण विकासाचे प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न, कायदा, शिक्षण, संगणक विज्ञान इत्यादी विषय आहेत. प्रतिष्ठानने सुरु केलेल्या उपक्रमांना पूरक असे हे विषय आहेत. महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय व आर्थिक विषयांवरील पुस्तकांना प्राधान्य दिले आहे. तसेच मा. यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या विविध पैलूंचे दर्शन घडविणारी पुस्तके व त्यांनी स्वतः लिहिलेली पुस्तके ग्रंथालयात आहेत. विविध ग्रंथ प्रदर्शनांना भेटी देऊन नवीन पुस्तके घेतली आहेत. तसेच काही दुर्मिळ ग्रंथही ग्रंथालयासाठी मिळविले आहेत. उदा.डॉ.केतकरांनी संपादित केलेल्या ज्ञानकोशाचे सर्व खंड. ग्रंथालयामध्ये निवडक इंग्रजी व मराठी कादंब-या तसेच चरित्रात्मक व आत्मचरित्रात्मक पुस्तके आहेत. संगणकविषयक ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध असून संगणक प्रशिक्षण वर्गाचे विद्यार्थीही या ग्रंथांचा लाभ घेत असतात. ग्रंथालयीन पुस्तकांचा व संदर्भ ग्रंथांचा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लाभ व्हावा या उद्देशाने नाममात्र वार्षिक वर्गणी रु.२५/- घेऊन त्यांना ग्रंथालय उपलब्ध केले आहे. इतर वाचकांसाठी ग्रंथालय वार्षिक वर्गणी रु.२५०/- आहे. तथापि, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबईच्या सदस्यांना सदर वर्गणी न आकारण्याचा निर्णय घेतला आहे.

शासकीय नियमानुसार ग्रंथालयाची आखणी केल्यामुळे आतापर्यंत एकूण शासकीय अनुदान रु.९३,९६०.०० मिळाले असून २००२-२००३ सालाचा पहिला हप्ता रु.१६,०००/- मिळाला आहे व दुसरा हप्ता रु.१६०००/- लवकरच मिळण्याची अपेक्षा आहे.

ग्रंथालयात सुमारे १३००० ग्रंथ असून सन २००२-२००३ या काळात ग्रंथालयात ६५१ नवीन पुस्तकांची भर घालण्यात आली आहे. त्यासाठी रु.१,६८,,५५९/- खर्च झालेले आहेत.

ग्रंथालयातील प्रत्येक पुस्तकाची संगणकावर लेखकाप्रमाणे व विषयाप्रमाणे तसेच पुस्तकाच्या नावाप्रमाणे नोंद केली आहे. वाचकांना माहिती तत्परतेने देण्यासाठी माहिती सेवेचा विस्तार संगणकाद्वारे वाढविला आहे. संगणकाद्वारे माहितीचे संयोजन केल्याने वाचकांना ग्रंथालयातील पुस्तकांची माहिती तत्परतेने उपलब्ध होते.

**ड) इंटरनेट प्लाझा** : विद्यार्थी आणि व्यावसायिकांनी इंटरनेट प्लाझाचा उपयोग करुन घेतला आहे. प्रतिष्ठानच्या विविध विभागांना आवश्यक असलेली माहिती इंटरनेटमधुन एकत्र करुन देण्यात येते. त्याचबरोबर माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी सेवा योजनासाठी इंटरनेटचा वापर केला. इंटरनेट प्लाझासाठी श्री.अशोक नाडकर्णी यांचे मार्गदर्शन मिळते.

**इ) केंद्र इमारतीमधील युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्सचे संशोधन केंद्र** : युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या भारतीय विभागाचे सहकार्य प्रतिष्ठानच्या काही उपक्रमांना लाभत असून महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग व सहकार या सामाजिक क्षेत्रांच्या भरीव वृध्दीसाठी ते फार महत्त्वाचे आहे. युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स इन इंडियाद्वारे महाराष्ट्रातील निरनिराळया क्षेत्रात प्रकल्प उभारण्यासाठी आर्थिक मदत कशी उपलब्ध करुन घेता येईल, याची माहिती प्रसिध्द केली जाते.

**ई) महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ** : महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ या संस्थेची स्थापना प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ कै.डॉ.धनंजयराव गाडगीळ यांनी सन १९५७ मध्ये केली. ही संस्था महाराष्ट्राचा आर्थिक व औद्योगिक विकास वेगाने आणि संतुलितपणे होण्यासाठी संशोधनाचे कार्य करते. महाराष्ट्रामध्ये उद्योग सुरु करण्यासाठी इच्छुक असणाऱ्या उद्योजकांना सांख्यिकीय माहिती पुरविणे, योग्य निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयांची माहिती देणे, चिकित्सकपध्दतीने अधिकृत आकडेवारी पुरविणे तसेच महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या उद्योगसंधीविषयी माहिती देणे अशी अनेक कामे ही संस्था करते. संस्थेने यावर्षी महाराष्ट्रभर उद्योजकांसाठी परिसंवाद, परिषदा व कार्यशाळा आयोजित केलेल्या आहेत. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई व सदरची संस्था परस्पर सहकार्याने काम करतात. त्यामुळे महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांना चालना मिळेल, असा विश्वास वाटतो. या उपक्रमासाठी महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाला केंद्र इमारतीतील तिसऱ्या मजल्यावरील जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**उ) बॉम्बे सिटीपॉलिसी रिसर्च फाऊंडेशन (बॉम्बे फर्स्ट)** : केंद्र इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील ४०० चौ.फूटाची जागा बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाऊंडेशन (बॉम्बे फर्स्ट) या सार्वजनिक न्यासास संशोधन कार्यासाठी वापरण्यास दिलेली आहे. बॉम्बे फर्स्ट ही संस्था बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स अँण्ड इंडस्ट्रिज आणि बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाऊंडेशन या संस्थांच्या पुढाकाराने व अनेक औद्योगिक/वाणिज्य क्षेत्रातील आस्थापनांच्या आर्थिक पाठबळावर १९९५ मध्ये अस्तित्वात आली. या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट मुंबई शहरातील वाढत्या लोकसंख्येचे आव्हान स्वीकारुन येथील पायाभूत सुविधांमध्ये विकास करुन नागरिकांच्या राहणीमानाची पातळी उंचावणे, काम करण्याच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे आणि भांडवली

गुंतवणूकदारांना आकर्षित करणे हे आहे. मुंबई शहराच्या विविध प्रश्नांवर विचार करण्यासाठी शासन, महानगरपालिका व इतर स्वयंसेवी संस्था यांचे समन्वयक म्हणून ही संस्था कार्य करते.

**ऊ) अनुबोधपट** : मा.चव्हाणसाहेबांच्या जीवनावर अनुबोधपट तयार करण्याचे काम नामवंत दिग्दर्शक डॉ.जब्बार पटेल यांचेकडे सोपविण्यात आलेले असून त्यांनी मा.यशवंतराव चव्हाण यांच्या सहवासातील समकालीन ज्येष्ठ मान्यवरांच्या मुलाखती घेण्याचे काम जवळजवळ पूर्ण केलेले आहे. अनुबोधपटासाठी महाराष्ट्र शासनाकडून आर्थिक साहाय्य मिळविण्यासाठी प्रतिष्ठान प्रयत्नशील आहे.

**२) यशवंतराव चव्हाण केंद्रात झालेले महत्त्वाचे कार्यक्रम**

**अ) मा.चव्हाणसाहेबांची पुण्यतिथि व जयंती** : मा.चव्हाणसाहेबांच्या १८ व्या पुण्यतिथिनिमित्त दि.२५ नोव्हेंबर २००२ रोजी चव्हाण सेंटरच्या मुख्य सभागृहात झालेल्या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ पत्रकार मा.श्री.गोविंदराव तळवलकर उपस्थित होते व अध्यक्षस्थान मा.श्री. शरदराव पवार यांनी भूषविले होते.

या कार्यक्रमात 'यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक समाजरचना पारितोषिक २००२', 'प्रयोग परिवार' सातारा या संस्थेला प्रदान करण्यात आले व 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २००२' जाहीर करण्यात आला. याच कार्यक्रमात महाविद्यालयीन नियतकालिकांच्या स्पर्धेमध्ये सर्वोत्कृष्ट ठरलेल्या विजेत्यांची नांवे जाहीर करुन प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या विविध स्पर्धांच्या बक्षिसांचे आणि 'यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार २००२' चे वितरण करण्यात आले.

मा. यशवंतराव चव्हाण यांचा ९० वा जयंती समारंभ बुधवार दि. १२ मार्च २००३ रोजी चव्हाण सेंटरच्या मुख्य सभागृहात संपन्न झाला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे अध्यक्ष,मा.श्री.शरद पवार हे होते. या समारंभात यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २००२ जागतिक कीर्तीचे खगोलशास्त्रज्ञ डॉ.जयंत नारळीकर यांना प्रदान करण्यात आला. समारंभाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत मा.श्री.मोहन धारिया, कार्याध्यक्ष यांनी केले. वरील दोन्ही कार्यक्रमास प्रतिष्ठानचे विश्वस्त व सदस्य तसेच इतर प्रतिष्ठित मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते.

**ब) यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक** : प्रतिष्ठानच्या उद्दिष्टांमधील एक भाग म्हणून खालीलक्षेत्रात भरीव कार्य करणा-या मान्यवर व्यक्ति वा संस्थेला चक्रीयपध्दतीने पारितोषिक व सन्मानपत्र देण्यात येते

१) यशवंतराव चव्हाण कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक
२) यशवंतराव चव्हाण सामाजिक एकात्मता पारितोषिक
३) यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास पारितोषिक
४) यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संस्कृती पारितोषिक

वर उल्लेखिल्याप्रमाणे यावर्षाचे 'यशवंतराव चव्हाण कृषी-औद्योगिक समाजरचना २००२' पारितोषिक 'प्रयोग परिवार'सातारा यांना मा.चव्हाणसाहेबांच्या १८ व्या पुण्यतिथीदिनी, २५ नोव्हेंबर २००२ रोजी मा.श्री.शरदराव पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. १ लाख रुपये व सन्मानपत्र असे या पारितोषिकाचे स्वरुप आहे.

**क) यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार :**

मा.यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय एकात्मता, लोकशाहीमूल्ये, सामाजिक-आर्थिक विकास या क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य करणा-या नामवंत व्यक्तीला 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार' व सन्मानपत्र देण्यात येते. रक्कम रुपये २ लाख व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. सुयोग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्यन्यायाधीश मा.श्री.वाय.व्ही.चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नेमण्यात आली आहे. या समितीचे सदस्य मा.श्री.आय.के.गुजराल,माजी पंतप्रधान, डॉ.श्रीमती नजमा हेपतुल्ला,उपाध्यक्ष,राज्यसभा, डॉ.होमी सेठना, डॉ.एम.एस.स्वामीनाथन, डॉ.भालचंद्र मुणगेकर, कुलगुरु,मुंबई विद्यापीठ (पदसिध्द) आणि सुप्रसिध्द संगीतकार श्री.भूपेन हजारीका हे आहेत. निवड समितीच्या शिफारशीनुसार यावर्षीचा राष्ट्रीय पुरस्कार जागतिक कीर्तीचे खगोलशास्त्रज्ञ डॉ.जयंत नारळीकर यांना मा.चव्हाणसाहेबांच्या ९० व्या जयंतीदिनी १२ मार्च २००३ रोजी मा.श्री.शरद पवार यांच्या हस्ते तसेच प्रतिष्ठानचे विश्वस्त व सभासद यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानपूर्वक देण्यात आला.

**ड) यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार वितरण** : महाराष्ट्रात उत्कृष्ट सामाजिक काम करणा-या युवकास नवभारत युवा आंदोलनाच्या वतीने देण्यात येणारा 'यशवंतराव चव्हाण युवा पुरस्कार २००२' यावर्षी श्रीमती सविता जाधव, पुणे व श्री. शाहीन नबीलाल शेख, सांगली यांना देण्यात आला. 'रोख रक्कम रु. ११०००/- व सन्मानपत्र' असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

**३. प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या स्पर्धा-पारितोषिक योजना :**

**अ) खुली निबंध स्पर्धा** : या स्पर्धेसाठी "वित्तीय संस्थांमधील गैरव्यवहार व त्यावरील उपाय". हा विषय निवडण्यात आला होता. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील २७ स्पर्धकांनी भाग घेतला होता. स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्री.राजा पटवर्धन यांनी काम केले. प्रथम पारितोषिक रु.५०००/- श्री.मयूरेश वासुदेव गद्रे,कल्याण, द्वितीय पारितोषिक रु.३०००/- श्री.चारुदत्त हरी जोशी,पनवेल, तृतीय पारितोषिक रु.२०००/- श्री. देवेंद्र श्रीकांत सुर्वे, ठाणे यांना मा. चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथीदिनी समारंभपूर्वक देण्यात आली.

**ब) यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन नियतकालिके पारितोषिक योजना** : महाराष्ट्रातील विद्यापीठांकडून त्यांच्याकडे प्राप्त झालेली महाविद्यालयांची नियतकालिके प्रतिष्ठानकडे मागविण्यात येतात. त्यांची छाननी परीक्षकांकडून करुन घेण्यात येते. यावर्षी श्रीमती उषा रामवाणी, श्रीमती आरती कदम, प्रा.लिना केदारे यांनी

नियतकालिकांचे परीक्षण केले. परीक्षकांच्या अभिप्रायानुसार खालील महाविद्यालयांच्या नियतकालिकांना पारितोषिके देण्यात आली.

| पारितोषिक | महाविद्यालयाचे नांव | नियतकालिकाचे नाव | विद्यापीठ |
|---|---|---|---|
| प्रथम पारितोषिक रु.१५०००/- | मु.जे महाविद्यालय,जळगाव | "अजिंठा" | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ |
| द्वितीय पारितोषिक रु.१०,०००/- | गोगटे-जोगळेकर महाविद्यालय,रत्नागिरी | "सहकार" | मुंबई विद्यापीठ. |
| तृतीय पारितोषिक रु.५०००/- | सरदार पटेल महाविद्यालय,चंद्रपूर | "शब्दगंधा" | नागपूर विद्यापीठ |

## क) यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन साहित्य पारितोषिक योजना :

महाविद्यालयातील १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी 'यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन साहित्य पारितोषिक' ही योजना प्रतिष्ठानने लेख, कथा व कविता या तीन साहित्यप्रकारांकरिता आयोजित केली होती. या साहित्य प्रकारांसाठी महाराष्ट्रातील महाविद्यालयांतील २०४ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. सदर स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्री.जनार्दन जाधव, श्री.दिलीप पांढरपट्टे, श्री.निळकंठ कदम यांनी काम पाहिले. या योजनेत खालील स्पर्धक विजयी ठरले.

### लेख

| पारितोषिक | विजेत्याचे नांव | विषय | कॉलेजचे नांव |
|---|---|---|---|
| तृतीय पारितोषिक रु.१०००/- आणि प्रशस्तीपत्र | श्री.यशपाल अ.जोगदंड,औरंगाबाद | "शिमगा" | शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालय,औरंगाबाद |
| उत्तेजनार्थ : रु.५००/- आणि प्रशस्तीपत्रक | श्री.शेखर अरगेलवार,चंद्रपूर | "आसरा" | सरदार पटेल महाविद्यालय,चंद्रपूर |
| रु.५००/- आणि प्रशस्तीपत्रक | श्री.दिनेश सरदारसिंग परदेशी,औरंगाबाद | "बाप नंबरी बेटा दसनंबरी" | शिवाजी वरिष्ठ महाविद्यालय कन्नड, जि-औरंगाबाद. |

वरील पारितोषिकांमध्ये प्रथम, द्वितीय क्रमांकास पात्र 'लेख' न आल्याने तृतीय क्रमांक देण्यात आला आहे.

### कथा :

| पारितोषिक | विजेत्याचे नांव | कथा | कॉलेजचे नांव |
|---|---|---|---|
| प्रथम पारितोषिक रु.२०००/- आणि प्रशस्तीपत्र | श्री.संतोष वि.कांबळे | 'पोरखेळ' | महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय,नाशिक |
| द्वितीय पारितोषिक रु.१५००/- आणि प्रशस्तीपत्र | श्री.मयूर लक्ष्मण हर्याण | 'कर्तव्य' | डॉ.टी.के.टोपे नाईट कॉलेज,मुंबई |
| तृतीय पारितोषिक रु.१०००/- आणि प्रशस्तीपत्र | श्रीमती सुजाता म.ठोकळे | 'अभिसारिका' | मुंबई विद्यापीठ,मुंबई |

## कविता

| पारितोषिक | विजेत्याचे नांव | कवितेचे नांव | कॉलेजचे नांव |
|---|---|---|---|
| प्रथम पारितोषिक रु.२०००/- आणि प्रशस्तीपत्रक | श्री.अरुण रसाळ | 'कविता लिवन इतक सोप आस्त का?' | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, मराठवाडा,औरंगाबाद |
| द्वितीय पारितोषिक रु.१५००/- आणि प्रशस्तीपत्र | श्री.संजय अ.सोनवणे | 'माहावारदान' | कला,शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय,राहुरी जि-अहमदनगर |
| तृतीय पारितोषिक रु.१०००/- प्रशस्तीपत्र | श्री.संतोष वि.कांबळे | 'ओवी' | महाराजा सयाजीराव गायकवाड कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,मालेगाव,जि-नाशिक |

४. **विशेष कार्यक्रम :**

**अ) देशातील बृहन्महाराष्ट्र मंडळांच्या प्रतिनिधींची बैठक** : मा.यशवंतराव चव्हाण हे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार होते व त्यांनी कल्पकतेने अनेकविध मार्गांनी महाराष्ट्रातील जनतेचा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात विकास घडवून आणला. केंद्र शासनात मंत्री या नात्याने देशाच्या तसेच जगाच्या निरनिराळया भागात झालेल्या दौ-यांमध्ये संबंधित ठिकाणच्या मराठी भाषिकांशी त्यांनी सतत संपर्क ठेवला होता. त्यांनी त्यांच्या हयातभर मराठी संस्कृतीचे संवर्धन केले. मा.यशवंतराव चव्हाण यांना मराठी नाटके, चित्रपट, संगीत, साहित्य, कला यामध्ये विशेष रुची होती. या क्षेत्रांत काम करीत असलेल्या अनेक कलाकारांशी व साहित्यिकांशी त्यांचे व्यक्तिगत स्नेहसंबंध होते. मा.चव्हाणसाहेबांच्या विधायक व पुरोगामी विचारांची नित्य स्मृति रहावी यासाठी देशातील प्रत्येक राज्याच्या राजधानीच्या ठिकाणी कार्यरत असलेल्या महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकर्त्यांशी संपर्क साधून त्या त्या राज्यामध्ये मा.चव्हाणसाहेबांची जयंती (१२ मार्च) व पुण्यतिथी (२५ नोव्हेंबर) या दिवशी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे यासाठी प्रतिष्ठानने ११ जुलै २००२ रोजी देशातील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या पदाधिका-यांची बैठक मुंबई येथे चव्हाण सेंटरमध्ये प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा.श्री.शरद पवार यांच्या उपस्थितीत आयोजित केली होती. या बैठकीस मा. मुख्यमंत्री विलासराव देशमुख व देशातील बृहन्महाराष्ट्र मंडळांचे १७ प्रतिनिधी उपस्थित होते.

**ब) ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा** : दि.१२ ऑक्टोबर २००२ रोजी प्रतिष्ठानच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा आयोजित करण्यात आलेला होता. या कार्यक्रमात प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष मा.श्री.मोहन धारिया यांच्या हस्ते ज्येष्ठ नागरिक असलेले सांगलीचे श्री.गणपतराव मोहिते यांचा सत्कार करण्यात आला व मा.श्री.रामभाऊ मोडारीकर आणि श्रीमती लीला मस्कार रेळे यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी होते. या मेळाव्यात भारतीय राज्यघटना, मालमत्तेचे हस्तांतरण, पोटगी, मुद्रांक कायदा, आयकर, ग्राहक संरक्षण, मोटार अपघात इत्यादि विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. डॉ.श्रीमती पेडणेकर यांनी ज्येष्ठ नागरिकांचा आहार व आरोग्य याविषयी सल्ला दिला.

तसेच श्री.अजय केतकर यांनी गुंतवणुकीबाबत सल्ला दिला व श्रीमती चांदेकर यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या ओळखपत्राविषयी मार्गदर्शन केले. या मेळाव्याचे स्वागत व प्रास्ताविक प्रतिष्ठानचे विश्वस्त मा.श्री.हुसेन दलवाई यांनी केले तर आभार प्रदर्शन विश्वस्त-मा.श्री.ज्ञानेश्वर खैरे यांनी केले. या मेळाव्याला ज्येष्ठ नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

**क) निवडक गदिमा** : मा.गजानन दिगंबर माडगुळकर यांच्या निर्वाणास २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त गदिमा प्रतिष्ठान, पुणे यांनी 'निवडक गदिमा' या एका विशेष कार्यक्रमाची निर्मिती केलेली आहे. १६५ च्यावर चित्रपट कथा, १६०० च्यावर गीते, कथा, कादंब-या आणि अजरामर गीतरामायण या गदिमांच्या साहित्याने मराठी मनाचे चैत्रबन फुलविले. या साहित्यातील मनाला भावली आणि ओंजळीमध्ये मावली ती फुले रसिकांना अर्पण करण्याचा सुजाण प्रयत्न म्हणजे 'निवडक गदिमा'. गदिमांची गीते, कथा, आत्मवृत्त, नृत्यगीते, कविता, चित्रपटांतील क्षणचित्रे, मान्यवरांच्या मुलाखती या सा-यांचा समावेश असलेला विशेष कार्यक्रम यशवंतराव चव्हाण सेंटर आणि नेहरु सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने चव्हाण सेंटरमध्ये दि.१३ मार्च २००३ रोजी मा.श्री. शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री. सुशीलकुमार शिंदे, उपमुख्यमंत्री मा.ना.श्री.छगन भुजबळ, विधानसभेचे अध्यक्ष मा.श्री.अरुण गुजराथी, विधानपरिषदेचे सभापती मा.प्रा.ना.स.फरांदे, मंत्रिमंडळातील सदस्य, आमदार, प्रतिष्ठानचे सदस्य व रसिकवर्ग मोठया संख्येने उपस्थित होते.

याच कार्यक्रमात मा.श्री.ना.धों.महानोर यांच्या 'अजिंठा' या दीर्घ कवितेच्या इंग्रजी भाषांतराचे प्रकाशन मा.श्री. शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये मा.श्री.ना.धों.महानोर यांचा मुख्यमंत्री मा.ना.श्री. सुशीलकुमार शिंदे, यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## ड ) सेंटर फॉर इंटरनॅशनल ट्रेड इन ॲग्रीकल्चर ॲण्ड ॲग्रोबेस्ड् इंडस्ट्रिज ('सीटा')

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने नवी दिल्ली येथे सीटा हा विभाग २ मे २००१ रोजी स्थापन केला. सीटाचे कार्यकारी संचालक म्हणून श्री.विजय सारढाणा काम पाहतात. हा विभाग जागतिक व्यापार संघटना (WTO) संबंधीच्या समस्यांवर काम करीत आहे. सीटाने आर्थिक वर्षात जी महत्त्वाची कामे केली ती खालीलप्रमाणे-

१. केंद्र सरकारशी जागतिक व्यापार संघटने (WTO) संबंधी विषयवार (साखर, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, कापूस उद्योग) चर्चा करुन सूचना केल्या.

२. सीटामार्फत वेळोवेळी कृषि उत्पादनांवर चर्चा व परिसंवाद आयोजित करण्यात येतात. त्यावेळी सीटा संबंधित विषयावर स्वतंत्र अहवाल तयार करुन सादर करतात.

३. न्यूझिलंडने भारताला मोठया प्रमाणावर (डंपिंग) बटर-ऑईल पाठविले होते. याविषयी सीटाने सखोल अभ्यास करुन केंद्र सरकारला अहवाल सादर केला आहे.

४. कांवडी. अंडी. सफरचंद. कापूस. दुग्धजन्य पदार्थ यांचे बाजारातील संशोधन करुन अहवाल तयार केलेला आहे.

५. ब-याचशा राज्यात द्राक्षाचे पीक घेतात. त्या पिकाबाबतच्या समस्यांवर सीटाने अभ्यास केलेला आहे.

६. भारताने परदेशातून आयात केलेल्या कोंबडयांना रोगाची लागण झालेली असल्याचे लक्षांत आल्याने ही बाब सीटाने केंद्र सरकारच्या निदर्शनास आणून देऊन केंद्र सरकारला अहवाल सादर केलेला आहे.

७. सीटाचे अहवाल वृत्तपत्रांतुन. दूरचित्रवाणी यासारख्या प्रसार माध्यमातून प्रसारित केले जातात.

८. वरील विषयाबाबत मा.श्री. शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली दि.२४ ऑक्टोबर २००२ रोजी सीटाच्या गव्हर्निंग कौन्सिलची बैठक आयोजित करण्यात आली होती.

**५) माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी सीडॅक,पुणे यांच्या संगणक प्रशिक्षणाचे अधिकृत केंद्र आहे. हे केंद्र सं १९९९ मध्ये स्थापन झालेले असून पहिल्या वर्षी या विभागाने सुरुवातीला डिप्लोमा इन अॅडव्हान्सड् कॉम्प्युटींग (DAC). आणि डिप्लोमा इन इन्फमेंशन टेक्नॉलॉजी (DIT) हे संगणक प्रशिक्षणाचे वर्ग सुरु केले. पहिल्या दोन वर्षात डिप्लोमा इन अॅडव्हान्सड् कॉम्प्युटींग (DAC) या अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद चांगला होता. त्यानंतर आर्थिक मंदीमुळे या वर्गाला कमी विद्यार्थी मिळू लागले. हे लक्षांत घेऊन माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी विभागाने संगणक प्रशिक्षणाचे इतर वर्ग सुरु केले. महाराष्ट्र स्टेट सर्टिफिकेट इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (MSCIT) तसेच डिप्लोमा इन अॅडव्हान्सड् कॉम्प्युटिंग इन आर्टस्. (DACA). डिप्लोमा इन मल्टिमिडिया क्रिएशन (DMC) तसेच सर्टिफिकेट कोर्स इन डटाबेस अॅडव्हान्सड् (CCDA), सर्टिफिकेट इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (CCIT) हे नवीन कोर्स चालू केलेले आहेत. याशिवाय डीओईएसीसी,नवी दिल्ली या उपक्रमाबरोबर करार करुन मुंबईमध्ये अधिकृत संगणक केंद्र सुरु करण्यासाठी कार्यवाही चालू आहे.

माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीच्या सर्व संगणक वर्गातील गेल्या ४ वर्षातील विद्यार्थ्यांची संख्या दर्शविणारा नक्शा खालीलप्रमाणे आहे.

| प्रशिक्षण वर्गाचे नांव | १९९९-२००० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ |
|---|---|---|---|---|
| डिप्लोमा इन अॅडव्हान्सड् कॉम्प्युटींग (DAC) | १८० | २५५ | १५१ | २५ |
| अॅडव्हान्सड् डिप्लोमा इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (ADIT) | – | ६७ | ५७ | ५२ |
| प्रीडॅक (PREDAC) | — | २० | ४८ | २१ |
| डिप्लोमा इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (DIT) | ८२८ | ५५४ | ५२७ | ३०१ |
| महाराष्ट्र स्टेट सर्टिफिकेट इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (MSCIT) | — | — | — | ५९० |
| डिप्लोमा इन अॅडव्हान्सड् कॉम्प्युटिंग इन आर्टस्. (DACA). | | | | ७ |
| डिप्लोमा इन मल्टिमिडिया क्रिएशन (DMC) | | | | १२ |
| सर्टिफिकेट इन डेटाबेस अॅडमिनिस्ट्रेशन (CCDA). | | | | १५ |
| सर्टिफिकेट कोर्स इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (CCIT) | | | | ११ |
| इतर कोर्सेस | | | | १९ |
| | १००८ | ८९६ | ७८३ | १०५३ |

## ६.प्रतिष्ठानच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर कार्यक्रम/उपक्रम :

**अ) भारतीय भटके विमुक्त संशोधन संस्था, संशोधन प्रकल्प,सातारा** : भारतीय भटके विमुक्त संशोधन संस्था, सातारा यांनी महाराष्ट्रातील भटक्या जमातींच्याविषयी पथदर्शक प्रकल्प जून १९९९ पासून सुरु केला आहे. पहिल्या टप्प्यात १८ जिल्हयांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून उर्वरित जिल्हयांचे सर्वेक्षण चालू आहे.

**ब) अंधश्रध्दा निर्मूलन कार्यक्रम** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई व महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती,सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रभर अंधश्रध्दा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन व महाराष्ट्रातील संत आणि समाजसुधारकांचा सत्यशोधकी वारसा याविषयी प्रबोधनाचे कार्यक्रम राबविले जातात. तसेच 'सत्यशोध प्रज्ञा परीक्षा'मार्फत महाराष्ट्रातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची तसेच प्राध्यापकांची शिबिरे आयोजित करण्यात येऊन परीक्षा घेतली जाते. प्रकल्पाचे अध्यक्ष डॉ.वसंतराव गोवारीकर व प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष मा.मोहन धारिया यांच्या सहीचे प्रमाणपत्र प्रशिक्षणार्थींना दिले जाते. बुवाबाजी संघर्ष व चमत्कार सत्यशोधन आवाहन अभियानाचा पहिला टप्पा पुणे, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, गोवा, बेळगांव, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, नगर, रायगड, ठाणे व मुंबई जिल्हयांत पार पडला. तीन जथ्यांद्वारे १५० कार्यक्रम झाले. दुस-या टप्प्यात लातूरपासून प्रारंभ करुन आणखी १५० कार्यकम होणार असून या कार्यक्रमाला उत्साही प्रतिसाद मिळत आहे.

**क) 'प्रथम-मुंबई शिक्षण उपक्रम'** : 'प्रथम-मुंबई शिक्षण उपक्रम' या संस्थेच्या उपक्रमाला प्रतिष्ठान सहकार्य देते. त्यास अनुसरुन 'प्रथम-मुंबई शिक्षण उपक्रम'च्या कार्यालयासाठी केंद्र इमारतीतील जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मुंबई शहरात झोपडपट्टीवासियांच्या मुलांना शिक्षणाची गोडी लागावी, म्हणून बालवाडया

चालविणे, संगणकांचे प्रशिक्षण देणे, झोपडपट्टीतील स्थानिक रहिवाशांमधून उपक्रमाकरिता शिक्षक-शिक्षिका तयार करणे इत्यादी महत्त्वपूर्ण कामे 'प्रथम-मुंबई शिक्षण उपक्रमा' मार्फत डॉ.माधव चव्हाण व श्रीमती फरिदा लांबे यांच्या मार्गदर्शनाखाली केली जातात.

**इ) इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन,महाराष्ट्र शाखा** : या संस्थेच्या वतीने दरवर्षी यशवंतराव चव्हाण मेमोरियल लेक्चर आयोजित करण्यात येते. सदर संस्थेने यावर्षी डॉ.किरीट पारिख, सन्माननीय निवृत्त प्राध्यापक, इंदिरा गांधी इन्स्टिटयूट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च, मुंबई यांचे 'जागतिकीकरण होत असलेल्या जगामधील गरिबी, सुस्थिति आणि प्रशासन' यावर व्याख्यान आयोजित केले होते. सदर व्याख्यानास अध्यक्ष म्हणून मुख्यसचिव, श्री. अजित निंबाळकर उपस्थित होते. तसेच वरिष्ठ शासकीय अधिकारी व प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते.

**७. यशवंतराव चव्हाण शिष्यवृत्ती :**

**अ) 'महाराष्ट्राच्या औद्योगिकरणाचे सामाजिक आणि सांस्कृतिक परिणाम' संशोधन प्रकल्प.**

औद्योगिकरणाचे समाजावर, भाषेवर, संस्कृतीवर, लोकांच्या राहणीमानावर काय परिणाम झाले याविषयीचे संशोधन श्री.प्रकाश देशमुख टप्प्याटप्प्याने पूर्ण करणार आहेत. श्री.देशमुख यांनी सदर प्रकल्पाचा कच्चा अहवाल प्रतिष्ठानला सादर केला आहे. अंतिम अहवाल लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत श्री.देशमुख यांना कळविण्यात आले आहे.

**८. प्रतिष्ठानमार्फत देण्यात आलेली अनुदाने** :अहवाल वर्षात खालील संस्थांना अनुदान देण्यात आले.

| क्र. | संस्थेचे नाव | विषय | अनुदान रक्कम |
|---|---|---|---|
| १ | सौ.वेणूताई चव्हाण चॅरिटेबल पब्लिक ट्रस्ट, कराड | 'संगणक भेट' | रु.८३,७०१/- |
| २ | सौ.वेणूताई चव्हाण चॅरिटेबल पब्लिक ट्रस्ट, कराड | सभागृहातील खुर्च्या दुरुस्तीसाठी | रु.२,२२,९३४/- |
| ३ | सार्वजनिक उत्सव समिती, नवी दिल्ली | 'यशवंतराव चव्हाण स्मृति समारोह'साठी | रु.३०,०००/- |
| ४ | श्रीमती अरुणा ढेरे | 'डॉ. विश्राम रामजी घोले व डॉ.रघुनाथ विठ्ठल खेडकर यांचे चरित्र व कार्य' शोध प्रकल्पासाठी | एकुण रु. ६३,०००/- त्यापैकी २००१-०२ मध्ये रु.४६,०००/- व २००२-०३ मध्ये रु.१७,०००/- देण्यात आले. |
| ५ | इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, महाराष्ट्र शाखा | मा.चव्हाणसाहेबांच्या स्मृतिव्याख्यानमालेसाठी | रु.१०,०००/- |

९. **प्रतिष्ठानला मिळालेले अनुदान :**

सन २००२-२००३ या सालामध्ये खालीलप्रमाणे अनुदान मिळाले.

| | |
|---|---|
| १. महाराष्ट्र शासन, गृह विभाग (विशेष) | रु.२,००,०००/- |
| २. ग्रंथालय संचालनालय,महाराष्ट्र शासन | रु. ३२,०००/- |

## १०. प्रतिष्ठानच्या विभागांमार्फत झालेले कार्यक्रम/उपक्रम :

### अ) कृषी व सहकार व्यासपीठ :

**सहकार विभाग :** कृषी-सहकार व्यासपीठाचे काम प्रतिष्ठानचे विश्वस्त मा.श्री.ज्ञानेश्वर खैरे यांचे अध्यक्षतेखाली व प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष मा.श्री.मोहन धारिया यांचे मार्गदर्शनाखाली चालते.

**सहकार विभाग :**

१. राज्य शासनाने गृहनिर्माण सहकारी संस्थांचे नवीन उपविधी मान्य करुन अंमलात आणण्याचे आदेश जारी केले. त्यावर विचार करण्यासाठी प्रतिष्ठान व पद्मश्री विखे-पाटील प्रबंध संस्थान,पुणे यांचे संयुक्त विद्यमाने एक परिषद दि.१९.५.२००२ रोजी आयोजित केली होती. त्यातील शिफारशी सहकार आयुक्तांना सादर केल्या. परिषदेतील बीजभाषण केंद्र शासनाचे माजी सचिव डॉ. दुभाषी यांनी दिले.
२. सहकार आयुक्तांनी एक विचारमंच स्थापन केला आहे. त्याचे सभासद म्हणून प्रतिष्ठानतर्फे श्री.एस.टी. भिडे व श्री.पी.टी. पंडित काम पाहतात.
३. पुणे जिल्हयातील नागरी सहकारी बँकांची एक कार्यशाळा वैकुंठभाई मेहता इन्स्टिटयूट व इंडियन सोसायटी फॉर स्टडीज इन को-ऑपरेशन यांच्या सहकार्याने भरविण्यात आली होती. त्यात मा.श्री. मोहन धारिया, श्री.परेरा, डॉ. बारीक, श्री.एस.टी. भिडे आणि पी.टी पंडित यांनी मार्गदर्शन केले.
४. प्रतिष्ठान व महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित यांचे संयुक्त विद्यमाने ना.बाळासाहेब विखेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली सहकारी पतयंत्रणा पुनरुज्जीवन समिती अहवालावर एक चर्चासत्र दि. १५-०९-२००२ रोजी पुणे येथे घेण्यात आले. त्यामध्ये २० जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व सर्व जिल्हा सहकारी बोर्ड यांचे प्रतिनिधींनी भाग घेतला. चर्चासत्रात मा.मोहन धारिया, ना.विखेपाटील, ना.आनंदराव अडसुळ, सहकार आयुक्त, श्री. गायकवाड, माजी केंद्रीय सचिव डॉ. दुभाषी, श्री. ज्ञानेश्वरबापू खैरे, श्री. अंकुश काकडे, संघाच्या अध्यक्षा श्रीमती खोडके, अॅड.एम.ए. देशमुख यांनी मार्गदर्शन केले. या परिषदेतील सूचनांच्याबाबत मा.ना.श्री. आनंदराव आडसूळ, राज्यमंत्री, अर्थखाते, भारत सरकार यांचे बरोबर श्री. ज्ञानेश्वर खैरे यांनी तीन वेळा चर्चा करुन प्रत्यक्ष पाठपुरावा केला.

किमान क्रेडिट कार्डच्या अंमलबजावणीमध्ये सुधारणा करुन कर्ज वाटपातला एक स्तर कमी करुन कमी व्याजाने शेतकऱ्याला कर्ज उपलब्ध करुन द्यावे यासाठी श्री.ज्ञानेश्वर खैरे यांनी ६ पानांचे निवेदन प्रसिध्द करुन त्याच्या ५००० प्रती राज्यभर संबंधितांना पाठविण्यात आल्या आहेत.

५. सहकार सप्ताहात प्रतिष्ठानतर्फे व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

## कृषी विभाग :

१. कृषि सहकार व्यासपीठ व वनराई यांचे संयुक्त विद्यमाने अनेक प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करण्यात आले. अनेक शेतकऱ्यांनी याचा लाभ घेतला आहे.

२. प्रभावशाली जीवाणू (इफेक्टीव्ह मायक्रो ऑरगॅनिझमस्) हे तंत्रज्ञान वापरुन शेतीत व सार्वजनिक आरोग्याचे कार्यात क्रांतीकारक सुधारणा करणे शक्य आहे. याबाबत श्री.अंकुश काकडे यांच्या अध्यक्षतेखाली सासवड येथे एक दिवसाचा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास 'निर्धार' या संस्थेचे डॉ.मुकुंदराव गायकवाड, 'सकाळ'चे श्री.वर्तक व 'वनराई'च्या श्रीमती साधना श्रॉफ उपस्थित होते. चर्चासत्रात ४० हायस्कूलमधील विज्ञान विषयाचे शिक्षक हजर होते.

३. कोळोशी येथील कोकण सिंचन विकास परिषदेचे एक अधिवेशन झाले. त्यात व्यासपीठाने भाग घेतला.

४. कृषि सहकार व्यासपीठाच्या अभ्यास मंडळाची बैठक दर शुक्रवारी वेगवेगळया विषयांवर चर्चा करण्यासाठी भरविण्यात येते. या चर्चेस श्री. कोरात्रे, प्रो. नाडकर्णी, डॉ. कामत, डॉ. घाणेकर, डॉ. मुकुंदराव गायकवाड, नाबार्डच्या निवृत्त अधिकारी श्रीमती मथुरे, डॉ. दुभाषी उपस्थित असतात.

५. अभ्यास मंडळातील चर्चेस अनुसरुन चार प्रस्ताव केंद्र शासनास अंदाजपत्रक २००३-२००४ च्या संबंधाने सादर करण्यात आले. या प्रस्तावांवर मा.ना.श्री. आनंदराव आडसूळ, राज्यमंत्री, अर्थखाते, भारत सरकार यांच्याबरोबर पुणे व मुंबई येथे चार वेळा श्री.ज्ञानेश्वर खैरे यांनी सविस्तर चर्चा केली.

**ब) महाराष्ट्र महिला व्यासपीठ** : व्यासपीठातर्फे खालीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

- दिनांक १५/४/२००२ रोजी 'स्त्री शक्ती संवर्धन केंद्र' यांच्या मार्फत चेंबूर येथे **'स्त्रियांचे प्रश्न व कायदे'** हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.
- दिनांक ४/५/२००२ रोजी मुलुंड कॉलनी येथे ५० **महिलांची बैठक** झाली. या बैठकीत महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे विविध उपक्रमांबद्दल तसेच बचतगट कसा चालवावा याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

- दिनांक २४ जुलै २००२ रोजी महिला व्यासपीठाने कुर्ला ते ठाणे परिसरातील **कार्यकर्त्यांना शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी बैठक** आयोजित केलेली होती.
- दिनांक १४ ऑगस्ट २००२ रोजी रात्री म्हणजे भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला नवभारत युवा आंदोलनाच्या सहयोगाने **'सांज फेरीचे'** आयोजन केले. स्वातंत्र्यदिनाच्या आदल्या रात्री मुंबईतील महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट देण्यात आली. त्यात २० महिला कार्यकर्त्यांनी भाग घेतला.
- दिनांक २६ ऑगस्ट २००२ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठाची **विभागीय केंद्राच्या कार्यकर्त्यांची बैठक** घेण्यात आली. या बैठकीत व्यासपीठाचे कार्यक्रम कसे असावेत व ते कशा पध्दतीने राबवावेत यावर चर्चा झाली.
- दिनांक १८/२/२००३ रोजी मानखुर्द येथे **उर्वी विक्रम चॅरिटेबल ट्रस्ट** यांच्यातर्फे महिलांकरीता **कायदेविषयक कार्यशाळा आयोजित करण्यात आली**. या कार्यक्रमांत हिंदू विवाह नोंद, हुंडा विरोधी कायदा, बलात्कार,पोलिस यंत्रणा,घटस्फोट, बालविवाह कायदेविषयक मार्गदर्शन करण्यात आले.
- दिनांक २१ फेब्रुवारी २००३ रोजी **'सौ वेणूताई चव्हाण'** जयंती निमित्त महिलांकरिता विविध खेळ व स्पर्धा घेण्यात आल्या.

## क) नवभारत युवा आंदोलन :

नवभारत युवा आंदोलनाचे कामकाज संयोजक श्री.प्रेमानंद रुपवते यांचे मार्गदर्शनाने संघटक श्री.दत्ता बाळसराफ करीत असतात. या विभागामार्फत खालील कार्यक्रम राबविण्यात आले.

- **यशवंतराव चव्हाण स्मृति महाविद्यालयीन गुणगौरव चषक निबंध व वक्तृत्व स्पर्धा** : सलगपणे आठव्या वर्षी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ स्तरावर निबंध व वक्तृत्व स्पर्धा. चार विद्यापीठांमध्ये वैशिष्ट्यपूर्णरीतीने कार्यशाळेसह दि.११ व १२ डिसेंबर २००२ रोजी मुंबई विद्यापीठ, विद्यार्थी भवन, वीरोड, चर्चगेट, मुंबई येथे, दि.१७ व १८ डिसेंबर २००२ रोजी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची प्रताप तत्वज्ञान केंद्र अमळनेर येथे, दि. ७ व ८ जाने २००३ रोजी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे व दि.१५ व १६ जानेवारी २००३ रोजी पुणे विद्यापीठाची स्पर्धा इंद्रायणी महाविद्यालय, तळेगांव-दाभाडे येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. यशस्वी स्पर्धकांना सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र व रोख रकमेच्या स्वरुपात पारितोषिके देण्यात आली. एकूण सुमारे ५०० विद्यार्थी-विद्यार्थीनी यात सहभागी झाले होते.
- **पर्यावरण संवर्धन व संरक्षण कार्यशाळा** : युसुफ मेहेर अली सेंटर,तारा,ता-पनवेल,जिल्हा-रायगड येथे दि. २३ व २४ जून २००२ रोजी दोन दिवसीय पर्यावरण संवर्धन व संरक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.
- **गझल-मुशायरा, कार्यशाळा** : नवभारत युवा आंदोलन, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र पुणे व गझल सागर प्रतिष्ठान,मुंबई यांचे संयुक्त विद्यमाने दि.१५.४.२००२ रोजी पुणे येथे एक दिवसीय गझल-मुशायरा व कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

- नवभारत युवा आंदोलन आणि आदिवासी कर्मचारी संघटना,नाशिक यांचे संयुक्त विद्यमाने **'आदिवासी कार्यकर्त्यांसाठी कार्यशाळा'** नाशिक येथे दि. ३,४,५ मे २००२ रोजी मुक्त विद्यापीठ नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती.
- **युवा श्रमसंस्कार छावणी :** नवभारत युवा आंदोलन आणि साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट यांचे वतीने विद्यार्थ्यांकरीता ५ दिवस युवा श्रम संस्कार छावणीचे आयोजन दि.६ ते १० मे २००२ रोजी सानेगुरुजी स्मारक ट्रस्ट, माणगांव येथे करण्यात आले होते. छावणीत श्रमदान, वृक्षारोपण, फिल्म, खेळ, गायन, अभिनय, काव्य आदि उपक्रम पार पडले.
- **समाज कार्यकर्ता प्रशिक्षणवर्ग आणि पत्रकारिता प्रशिक्षण वर्ग (६ महिने):** सामाजिक कार्याची व पत्रकारितेची आवड असणा-या ६० युवा स्त्री/पुरुषांकरीता प्रशिक्षणवर्गाचे आयोजन करण्यात आले होते.
- **एड्स प्रतिबंधक प्रशिक्षण नेतृत्व कार्यशाळा :** मुंबई, परभणी, आळेफाटा (ता-जुन्नर,जि-पुणे) संगमनेर, अमळनेर येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात २५० प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. यातुन नवीन प्रशिक्षक व प्रचारक तयार करण्यात आले.
- **स्वातंत्र्यदिन जागरण फेरी :** दि.१४ ऑगस्ट २००२ च्या रात्री भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त मुंबईतील कार्यकर्त्यांच्या स्वातंत्र्यदिन जनजागरण फेरीचे आयोजन करण्यात आले होते. फेरीमध्ये राष्ट्रीय स्मारकांना भेटी, कार्यकर्त्यांचे मनोगत, संविधान प्रतिज्ञा, राष्ट्रगीत घेण्यात आले.

**सद्भावनादिन कार्यक्रम :**

नवभारत युवा आंदोलन व युवक बिरादरी यांचे संयुक्त विद्यमाने 'सद्भावना दिना' निमित्त बॅले नृत्याचा कार्यक्रम दि.२२.८.२००२ रोजी चव्हाण सेंटर येथे आयोजित करण्यात आला होता. राष्ट्रीय एकात्मता या विषयावर वेगवेगळी नृत्ये सादर करण्यात आली होती.

**शालेय/महाविद्यालयीन युवतींची कायदेविषयक जागृती शिबिरे :**

नवभारत युवा आंदोलन, महाराष्ट्र राज्य महिला आयोग (महाराष्ट्र शासन) व यु.एन.एफ.पी.ए. यांचे वतीने राज्यातील गडचिरोली, चंद्रपूर, नंदुरबार, धुळे, ठाणे (५ जिल्हे) ठाणे-कल्याण, उल्हासनगर, भिवंडी, पुणे (शहरी क्षेत्र) या भागामध्ये शालेय/महाविद्यालयीन युवतींची कायदेविषयक जागृती शिबिरे आयोजित करण्यात आली होती. ऑक्टोबर २००२ ते जानेवारी २००३ या कालावधीमध्ये ३४५ (निबंध स्पर्धेसह) शिबिरे आयोजित केली होती. यामध्ये १८००० विद्यार्थिनींनी भाग घेतला. या शिबिरांकरीता, माहितीपत्रके, प्रमाणपत्रे, पोस्टर्स इत्यादि साहित्य तयार करण्यात आले व १०० हून अधिक प्रशिक्षकांनी या शिबिरांमधे भाग घेतला.

- **वेध चळवळींचा-पुस्तक प्रकाशन :** नवभारत युवा आंदोलन, क्राय व बालहक्क अभियान यांचे विद्यमाने 'वेध शिक्षण व इतिहासातील धर्मांधाच्या घुसखोरीचा' या नावाचे पुस्तक दि. २१.८.२००२ रोजी चव्हाण सेंटर येथे प्रकाशित करण्यात आले.

- दारिद्र्यरेषा, रेशनधोरण, अन्न अधिकार अभियान याबाबत सहभाग व अमळनेर, औरंगाबाद येथे कार्यशाळा, परिषदा, बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या.
- जळगांव आणि नाशिक येथील 'युवा कार्यकर्ता' शिबिरात राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडता, रेशनचे प्रश्न या विषयांवर चर्चा झाली.
- बांधकाम मजुरांमध्ये काम करणा-या कार्यकर्त्यांची बैठक दि. ३ ऑगस्ट २००२ रोजी चव्हाण सेंटर येथे आयोजित करण्यात आली होती. कर्नाटक, चेन्नई, मुंबई व महाराष्ट्रातील कार्यकर्ते सहभागी झाले होते.
- सांगली येथे 'राष्ट्रीय एकात्मता-काळाची गरज' या विषयावर श्री.प्रेमानंद रुपवते यांचे प्रमुख भाषण.
- बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि-सातारा यांचे सहकार्याने विद्यार्थिनींकरीता दोन दिवसांचे 'युवती सक्षमीकरण शिबिर' पाटण येथे दि.२५ व २६ ऑगस्ट २००२ रोजी घेण्यात आले.
- रायगड जिल्ह्यातील आदिवासी (कातकरी) मेळाव्यात श्री. प्रेमानंद रुपवते यांचे प्रमुख भाषण.
- 'शालेय पोषण आहार'-सर्वांची जबाबदारी' या विषयावर महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांची बैठक दि.४ सप्टेंबर २००२ रोजी चव्हाण सेंटर येथे आयोजित करण्यात आली.
- संगिनी महिला मंडळ, नाशिक यांनी छत्रपती शाहु महाराज यांची जयंती व आरक्षण शताब्दी निमित्त प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण घेतलेल्या दहावीतून उत्तीर्ण झालेल्या ५४ विद्यार्थी विद्यार्थिनींचा सत्कार दि.२६ जुलै २००२ रोजी डॉ. पलुसकर सभागृह,नाशिक येथे श्री. प्रेमानंद रुपवते यांचे हस्ते केला.
- नवभारत युवा आंदोलनाच्या कार्यकर्त्यांसाठी दि.२३.२.२००३ रोजी एकदिवसीय कायदेविषयक कार्यशाळा चव्हाण सेंटर येथे आयोजित केली.
- प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष दिवंगत दादासाहेब रुपवते यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम दि.२८.२.२००३ रोजी भंडारदरा, जि-अहमदनगर येथे झाला.
- पिनॅकल क्लब यांचे सहकार्याने छायाचित्र प्रदर्शन आणि छायाचित्रांची राष्ट्रीय स्पर्धा.

## ड) मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम :

१. मोफत कायदेविषयक सल्ला केंद्र : महिन्याच्या दर शुक्रवारी कायदेविषयक सल्ला केंद्र सुरु असते.

२. पौगंडावस्थेतील मुलां-मुलींकरिता व्यक्तिमत्व विकास शिबिरे : इयत्ता ८ वी ते इयत्ता १२ वीच्या आणि महाविद्यालयीन मुलां-मुलींकरिता भारतीय राज्यघटना, विवाह कायदा, पोटगीचा कायदा, जीवनमूल्ये या विषयांवर चर्चा स्वरुपात व्याख्याने दिली. यावर्षी मुंबई परिसरातील खालील ठिकाणी एक दिवसीय शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

अ) पंत समर्थ विद्यामंदिर,जोगेश्वरी, ब) मॉडर्न कॉलेज,वाशी,नवी मुंबई,
क) सिध्दार्थ कॉलेज,फोर्ट, ड) जे.एम.पटेल कॉलेज, गोरेगाव

३. ज्येष्ठ नागरिकांची कार्यशाळा : यांमध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या संघांचे सहकार्य मिळत असते. या कार्यशाळांमध्ये ग्राहक संरक्षण कायदा, प्रॉपर्टीचा कायदा, इच्छापत्र, गुंतवणूक आणि सामाजिक/घरगुती प्रश्न या विषयांवर चर्चा केली जाते. अशा कार्यशाळा तीन ठिकाणी घेण्यात आल्या.

४. कार्यकर्त्यांची कार्यशाळा : कार्यकर्त्यांना कायद्याच्या माहितीद्वारे सक्षम बनविण्याकरता चार ठिकाणी कार्यशाळा आयोजित केल्या.

५. महिलांच्या प्रश्नांसंबंधी कार्यशाळा : महिलांचे कायद्याद्वारे सक्षमीकरण करण्यासाठी महिलांच्या प्रश्नांवर विविध संघटनांच्या सहकार्याने पांच ठिकाणी कार्यशाळा आयोजित केल्या होत्या.

६. मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरमच्या बैठका : या सालात समितीच्या १२ बैठका व उपसमितीच्या ६ बैठका आयोजित करण्यात आल्या.

७. अंधश्रध्दा निर्मूलन विधेयक : अंधश्रध्दा निर्मूलन विधेयकामध्ये सुधारणा करण्याबाबत न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी आणि श्री. सुरेशकुमार,सचिव,समाजकल्याण विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या दोन बैठका झाल्या. विधेयकामध्ये सुचविण्यात आलेल्या सुधारणांना अंतिम स्वरुप देण्यात आले.

इ) रंगस्वर विभाग :

प्रतिष्ठानच्या रंगस्वरतर्फे नाटय, चित्रपट, गायन आदि कार्यक्रम होतात. वार्षिक वर्गणी रुपये. ५००/- व पती-पत्नीसाठी रुपये. ७५०/- भरुन रंगस्वरचे सभासद होता येते. रंगस्वरच्या सदस्यांना तसेच प्रतिष्ठानच्या आजीव सदस्यांनाही सवलतीच्या दरात वरील कार्यक्रमांचा आस्वाद घेता येतो. सांस्कृतिक विभागासाठी डॉ. रवि बापट यांच्या मार्गदर्शनाखाली सल्लागार समिती व संघटन समिती असून त्यांच्यामार्फत कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येते. यावर्षामध्ये रंगस्वरच्या काही महत्त्वाच्या कार्यक्रमांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

भीमसेन जोशी अध्यासनातर्फे दर महिन्याला दोन नवीन कलाकारांची गायनाच्या अथवा वादनाच्या माध्यमातून ओळख करुन देण्यात आली. यावर्षी सानिया कुलकर्णी, पल्लवी जोशी, कविता खरवंडीकर, सौ.अपूर्वा गोखले, वर्षा जोशी, माधुरी नातु, श्री.चंद्र महाजन, पौर्णिमा भट-कुलकर्णी, श्रृती गोखले, सौ.विद्या खांडगे यांचे शास्त्रीय गायनाचे कार्यक्रम झाले. प्रभात चित्र मंडळ व रंगस्वर यांच्या संयुक्त विद्यमाने थॅच्ड् समरीज्, दि रेड सूट, बास्सा, नसीम, गर्महवा, रिव्हीम ॲन ॲक्टर्स रिव्हेंज, दि वुमन ऑफ डयुनस्, दि.संव्हेंज् हे विविध भाषेतील चित्रपट दाखविण्यात आले.

# विशेष कार्यक्रम



चव्हाण सेंटर व नेहरु सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने गदिमा प्रतिष्ठान, पुणे यांनी निर्मिती केलेला 'निवडक गदिमा' या कार्यक्रमाचे सादरीकरण करताना श्री. रविंद्र साठे, श्रीमती अनुराधा मराठे, श्रीमती विभावरी आपटे, श्री. प्रमोद रानडे, श्री. उपेंद्र भट.



'निवडक गदिमा' कार्यक्रम पाहताना मा.श्री. शरद पवार, अध्यक्ष, मा.श्री. सुशिलकुमार शिंदे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.श्री. अरुण गुजराथी, अध्यक्ष, विधानसभा, मा.श्री.ना.स. फरांदे, सभापति, विधान परिषद, श्री. नरेंद्र जाधव, मा. मंत्रीगण.



देशातील बृहन्महाराष्ट्र मंडळांच्या
प्रतिनिधींच्या बैठकीस उपस्थित असलेले
मा.श्री. शरद पवार, अध्यक्ष,
मा.श्री. विलासराव देशमुख, मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य, मा.श्री. कमलाकर म्हेत्रे,
कोषाध्यक्ष, मा.श्री. हुसेन दलवाई,
विश्वस्त व मंडळाच्या अध्यक्षा
श्रीमती मीना पिंपळापुरे,
पदाधिकारी व सदस्य.

सेंटर फॉर इंटरनॅशनल ट्रेड इन
अॅग्रीकल्चर अॅण्ड अॅग्रोबेस्ड् (सीटा)
परिषदेत मार्गदर्शन करताना
मा.श्री. शरद पवार, अध्यक्ष,
मा.श्री. मोहन धारिया, कार्याध्यक्ष,
मा.श्री. हुसेन दलवाई, विश्वस्त,
मा.श्री. सनत मेहता,
मा.श्री. शिवाजीराव गि. पाटील,
श्रीमती अनुराधा देसाई.





डॉ. जयंत नारळीकर,
खगोलशास्त्राविषयी इयत्ता पाचवी ते
नववीतील विद्यार्थ्यांना माहिती देताना.



मा.श्री.ना.धों. महानोर यांच्या
'अजिंठा' या दीर्घ कवितेच्या इंग्रजी
भाषांतराचे प्रकाशन करताना
मा.श्री. शरद पवार, अध्यक्ष व
मा.श्री. सुशिलकुमार शिंदे,
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

ज्येष्ठ नागरिकांच्या सत्कारप्रसंगी
मार्गदर्शन करताना
मा.श्री. मोहन धारिया, कार्याध्यक्ष,
मा.श्री. हुसेन दलवाई, विश्वस्त
व सत्कारमूर्ती -
मा.श्री. गणपतराव मोहिते,
मा.श्री. रामभाऊ मोहाडीकर
मा. श्रीमती लीला मस्तकार रेळे.






कृषि व सहकार व्यासपीठामार्फत
पुणे येथे 'पतपुरवठा संस्थेचा
पुनर्जीवनाचा भारत सरकारचा
कार्यक्रम' याविषयी बैठकीस
उपस्थित मा.श्री. आनंदराव आडसूळ,
वित्त, राज्यमंत्री, भारत सरकार,
मा.श्री. बाळासाहेब विखे-पाटील,
उद्योगमंत्री, भारत सरकार,
मा.श्री. मोहन धारिया, कार्याध्यक्ष,
मा.श्री. ज्ञानेश्वर खैरे, विश्वस्त.

पुणे केंद्रामार्फत प्रभावशाली
जीवाणू तंत्रज्ञानाच्या शेतीत व
सार्वजनिक आरोग्याच्या कार्यात
वापर या विषयावरील बैठकीचे
उद्घाटन करताना
मा.श्री. अंकुश काकडे, सोबत
मा.श्री. ज्ञानेश्वर खैरे, विश्वस्त,
श्री.एस.टी. भिडे.






कराड केंद्रातर्फे कादंबरीकार
श्री. विश्वास पाटील यांना
